## साथी संस्था, पुणे संचलित व
## कर्वे समाज सेवा संस्था, पुणे, मान्यताप्राप्त

# प्रमाणपत्र कोर्स

## आरोग्यसेवांवर सामाजिक उत्तरदायित्व

सामाजिक सेवांच्या उत्तरदायित्वाविषयी स्थानिक पातळीवर काम करणाऱ्या
कार्यकर्त्यांचा दृष्टिकोन सखोल व व्यापक करण्यासाठी....

**दूरस्थ शिक्षण अभ्यासक्रम कोर्स**

## मोड्युल - १

## आरोग्य अधिकार व आरोग्यसेवांचा अधिकार















- संकलन
  **भाऊसाहेब आहेर**

- साहाय्य
  **डॉ. नितिन जाधव**

- मुखपृष्ठ
  **भाऊसाहेब आहेर**
  **गजानन लोंढे**

- मांडणी
  **शारदा महल्ले**

- **मार्च, २०१६**

- **प्रकाशक**

SATHI
Flat No. 3 & 4, Aman E Terrace, Dahanukar Colony, Kothrud, Pune - 411029
Ph. No. (020) 25472325, 7588032218
Website - www.sathicehat.org, Email - sathicehat@gmail.com

| **आयोजक** | **मान्यता** | **अर्थसाहाय्य** |
|---|---|---|
| साथी | ESTD. 1963 कर्वे समाज सेवा संस्था | कोपासा |

## मोड्युल - १

# आरोग्य अधिकार
# व
# आरोग्यसेवांचा अधिकार

सामाजिक सेवांच्या उत्तरदायित्वाविषयी स्थानिक पातळीवर काम करणाऱ्या
कार्यकर्त्यांचा दृष्टिकोन सखोल व व्यापक करण्यासाठी....
**दूरस्थ शिक्षण अभ्यासक्रम कोर्स**

संकलन
**भाऊसाहेब आहेर**

मार्गदर्शन
**डॉ. नितिन जाधव**

साथी

# या कोर्सविषयी थोडक्यात...

भारतात गेल्या दशकभरात सार्वजनिक आरोग्यसेवांमध्ये सुधारणा घडविण्यासाठी, आरोग्य यंत्रणा व जनतेमध्ये संवादाची प्रक्रिया घडविण्यासाठी, आरोग्य यंत्रणेचे जनतेप्रती उत्तरदायित्व व आरोग्यसेवांमधील पारदर्शकता वाढण्यासाठी विविध संस्था-संगठनांनी प्रयत्न केले आहेत. त्याची परिणिती म्हणूनच भारतात लोकाधारित देखरेखीचे विविध मॉडेल्स विकसित झाले आहेत. तुमच्या सारखे गावपातळीवर काम करणारे कार्यकर्ते विशेष करून लोकाधारित देखरेख राबवण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावत आहेत. त्यामुळेच महाराष्ट्रात तरी लोकाधारित देखरेखीची संकल्पना रुजत आहे. आमच्या मते संकल्पनेचा विस्तार व्हायला हवा. त्यासाठी नवीन कार्यकर्त्यांची फळी उभी करणे ही गरज लक्षात घेता हा कोर्स घेण्यात येत आहे.

हा अभ्यासक्रम संपूर्ण महाराष्ट्रभर राबविण्यात येणार असून पहिल्या टप्प्यात विदर्भ, मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र, कोंकण, उत्तर महाराष्ट्र या विभागातील एकूण १२५ विद्यार्थी कार्यकर्त्यांचा समावेश असणार आहे. प्रत्येक विभागातून २५ विद्यार्थी कार्यकर्त्यांची निवड करण्यात आली आहे.

हा कोर्स 'साथी' संस्था'व सामाजिक कार्याची पदवी (MSW) देणाऱ्या 'कर्वे समाजसेवा संस्था' यांच्या संयुक्त विद्यमाने राबवण्यात येत आहे. या कोर्सला आंतरराष्ट्रीय स्तरावर आरोग्यसेवांवर सामाजिक उत्तरदायित्व व कृतीसाठी काम करणाऱ्या 'कोपासा' (Community-of Practitioners on Accountability and Social Action in Health) या आंतरराष्ट्रीय समूहाचे आर्थिक सहकार्य मिळाले आहे. हा कोर्स मुख्यत्वे दूरस्थ शिक्षण (distance-learning) प्रकारचा असून या कोर्सचा कालावधी एक वर्षाचा आहे. वर्षभरात दोन संपर्क सत्र आयोजित (contact session) केले जाणार असून पहिले संपर्क सत्र हे ३ दिवसांचे असेल तर दुसरे संपर्क सत्र हे एक दिवसाचे असेल. पहिल्या संपर्क सत्रात सहभागी प्रतिनिधींना प्रशिक्षण व कोर्ससंबंधी प्रशिक्षण साहित्य देण्यात येईल. तर दुसऱ्या संपर्क सत्रात परीक्षा व विद्यार्थी कार्यकर्त्यांनी आपल्या कार्यक्षेत्रात केलेल्या उपक्रमांबद्दल चर्चा करण्यात येईल. विद्यार्थी कार्यकर्त्यांनी पहिल्या संपर्क सत्रानंतर आपल्या कार्यक्षेत्रात मार्गदर्शक पुस्तकात दिल्याप्रमाणे गतिविधी (Field Activity) करणे अपेक्षित आहे.

**या अभ्यासक्रमाचे मुख्य उद्दिष्ट्ये**

- विविध आरोग्यसेवा व सामाजिक सेवांवर उत्तदायित्व हे तत्त्व समजून घेण्यासाठी कार्यकर्त्यांची व्यापक समज आणि दृष्टिकोन विकसित करणे.
- विविध सामाजिक संघटनांकडून ॲडव्होकसीसाठी वापरण्यात येणाऱ्या विविध पद्धतींचा व रणनीतिबाबत या कार्यकर्त्यांचा दृष्टिकोन व समज वाढवणे.

# मार्गदर्शक पुस्तिका (मोड्युल) विषयी थोडक्यात...

सध्या आरोग्य क्षेत्रात ढोबळमानाने दोन दृष्टिकोनातून काम केले जात आहे. एक म्हणजे सेवाभावी दृष्टिकोन ज्यामध्ये लोकांना वेगवेगळ्या प्रकारच्या आरोग्यसेवा पुरवणे हा त्याचा मुख्य हेतू असतो. आणि दुसरा दृष्टिकोन म्हणजे हक्काधारित दृष्टिकोनातून काम करणे. यामध्ये आरोग्यसेवा मिळणे हा लोकांचा अधिकार आहे. लोकांना आरोग्यसेवा पुरवण्याची मुख्य जबाबदारी सरकारची असून लोकांना जर ती मिळत नसेल तर सरकारकडे मागण्यासाठी लोकांना उभे करण्याचा मुख्य हेतू या दृष्टिकोनात आहे. या हक्काधारित दृष्टिकोनाबद्दलची सविस्तर मांडणी या मोड्युलमध्ये केली आहे. त्याचप्रमाणे आरोग्याची खऱ्या अर्थाने व्याख्या कशी करावी? आरोग्यावर परिणाम करणारे आधारभूत घटक कोणते? समाजातील सामाजिक, आर्थिक विषमता, त्यांचा व्यक्तीच्या आरोग्यावर काय दुष्परिणाम होतो व त्यांना कमी तसेच प्रतिबंधित करण्यासाठी हक्काधारित दृष्टिकोनातून बघण्याची कशी गरज आहे याबद्दलची माहिती आपण या मोड्युलद्वारे घेण्याचा प्रयत्न करणार आहोत. प्रत्येक नागरिकाचे आरोग्य अबाधित राखणे हे शासनाचे कर्तव्य तसेच जबाबदारी असते. शासनाचे नागरिकांच्या आरोग्याप्रती असलेले दायित्व व त्याची पूर्तता करून घेण्यासाठी नागरिकांना हक्काचा वापर कसा करता येईल याचा ऊहापोह या मोड्युलमध्ये करण्यात आलेला आहे.

या मोड्युलमध्ये सुरुवातीला आपण मानवी हक्कांची संकल्पना, व आरोग्याला हक्काधारित दृष्टिकोनातून कसे बघता येईल याबद्दल चर्चा करणार आहोत. तसेच समता, समानता व आरोग्यविषयक विषमता म्हणजे काय? त्यांचा आरोग्यावर काय परिणाम होतो? लिंगभाव म्हणजे काय? स्त्री आरोग्यासंबंधीचे प्रश्न कोणते? हे समजून घेणार आहोत व आपापल्या पातळीवर विकेंद्रितरित्या आरोग्यविषयक नियोजन करून हे प्रश्न कसे सोडवायचे याबद्दलची माहिती करून घेण्याचा प्रयत्न करणार आहोत. त्यांना दूर करण्यासाठी आपापल्या पातळीवर विकेंद्रीतरित्या आरोग्याचे नियोजन करून कसे सोडवायचे याबद्दलची माहिती करून घेण्याचा प्रयत्न करणार आहोत.

हे मोड्युल विकसित करण्यासाठी आमच्या 'साथी' संस्थेच्या विविध प्रकाशनांची मदत झाली असून 'कर्वे समाज सेवा' संस्था व आंतरराष्ट्रीय स्तरावर आरोग्यसेवांवर सामाजिक उत्तरदायित्व व कृतीसाठी काम करणाऱ्या 'कोपासा' या नेटवर्कच्या सुकाणू समितीने या मोड्युलचे समीक्षण केले आहे.

# अनुक्रमणिका

**प्रकरण १-**

हक्काधारित दृष्टिकोनातून आरोग्य व मानवी हक्क........... ५

**प्रकरण २-**

आरोग्यसेवा व आरोग्याचा हक्क..................................१४

**प्रकरण ३-**

समता व समानता दृष्टिकोन......................................३२

**प्रकरण ४-**

लिंगभाव आणि आरोग्य विषमता.................................५०

**परिशिष्ट- १**..................................................६२